दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक १५४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.२८ ऑगस्ट २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# गणेशोत्सव पुर्वतयारीसाठी महापालिका, शासकिय विभाग आणि गणेश मंडळे यांची बैठक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**कोरोनाची दुसरी लाट आटोक्यात आली आहे मात्र गणेशोत्सवाच्या काळात प्रादुर्भाव वाढण्याचा धोका असल्याने जनतेची काळजी घेणे गरजेचे आहे. आपण आपल्या भावनांना आवर घालून कमीत कमी गर्दी करण्याचा प्रयत्न करा. गणेश उत्सव सुरक्षित आणि काळजी घेऊन साजरा करू या असे प्रतिपादन सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पनवेल महानगरपालिकेच्यावतीने घेतलेल्या सार्वजनिक गणेश मंडळांच्या पूर्व नियोजनाच्या बैठकीत केले. महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक घेण्यात आली.**



यावेळी मंचावरती महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, महिला बालकल्याण सभापती मोनिका महानवर, प्रभाग समिती अ च्या सभापती अनिता पाटील, सहाय्यक पोलिस आयुक्त भागवत सोनावणे, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त विठ्ठल डाके ,सहाय्यक आयुक्त धैर्यशील जाधव, सिडको अधिकारी उपस्थित होते.

परेश ठाकूर म्हणाले कोरोनाच्या पार्श्वभूमीवरती नागरिकांनी गणेश विसर्जन सार्वजनिक ठिकाणी न करता घरच्या घरी किंवा विसर्जनासाठी खास तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावांमध्ये करावे. विसर्जनावेळी कमीत कमी गर्दी करावी. सहाय्यक पोलिस आयुक्त भागवत यांनी गणेशोत्सवासाठी शासनाने दिलेले नियम सर्वांना सांगितले.

महानगरपालिकेने खास गणेशोत्सवासाठी रजिस्ट्रेशन करण्यासाठी बनविलेल्या ऑनलाईन अर्जाचे प्रेझेंटेशन यावेळी करण्यात आले. Smartpmc.in या संकेतस्थळावर जाऊन गणेश मंडळांनी आपले रजिस्ट्रेशन करावे असे पालिकेच्यावतीने यावेळी सांगण्यात आले. महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल यांनी नियमांचे पालन करून सण साजरा करूया असे सांगितले.

उपायुक्त विठ्ठल डाके यांनी सार्वजनिक गणेश मंडळांनी गणेशोत्सवाकरिता महानगरपालिका, पोलिस विभाग, ट्राफीक पोलीस यांची परवानगी घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच गणेशोत्सवासाठी महापालिकेच्या सर्व विभागांनी तयारी सुरू केली असल्याचे सांगितले. यापुढे येणारे दहीहंडी व गणेशोत्सव सण शासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करून साजरे करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमास नगर सेवक, नगरसेविका, पोलिस विभागातील अधिकारी-कर्मचारी, वीज मंडळ अधिकारी, महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी, सिडको अधिकारी, पनवेल कार्यक्षेत्रातील विविध गणोशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांची आयुक्तांनी घेतली भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांची पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी पनवेल कार्यक्षेत्रातील विविध विषयांवरती चर्चा करण्यात आली.

गेल्या महिन्याभरामध्ये पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोनाच्या रूग्णसंख्येत घट झाली असली तरी कोरोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यात सर्वत्र तिसऱ्या लाटेची पूर्वतयारी सुरू असताना पनवेल महानगरपालिकाही युध्द पातळीवर तयारी करत आहे. कळंबोली येथील भारतीय कपास निगमच्या गोदामांमध्ये ६३५ खाटांचे जंबो कोविड सेंटर उभारले जात आहे. येत्या काही दिवसांमध्ये सिडको याचे हस्तांतरण पनवेल महानगरपालिकेकडे करणार आहे.

कोरोनाची तिसरी लाट आल्यास पनवेल पालिका क्षेत्रासह रायगड जिल्ह्यातील विविध ठिकाणाहून रूग्ण याठिकाणी उपचारास येण्याची शक्यता असल्याने हे जंबो कोविड सेंटर महत्वाचे ठरणार आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांची आयुक्तांनी भेट घेऊन कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेच्या तयारी विषयी महापालिका करत असलेल्या कामाची माहिती दिली. या अनुषंगाने येणाऱ्या समस्यांवरती यावेळी चर्चा करण्यात आली. तसेच पालिका कार्यक्षेत्रातील विविध प्रश्नांवरती यावेळी चर्चा करण्यात आली. यावेळी उपायुक्त सचिन पवार उपस्थित होते.



## संक्षिप्त...

### २४ तासांत ४,६५४ नव्या रुग्णांची नोंद

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील जनतेसाठी काहीसे चिंताजनक असे वृत्त आहे. नव्या कोरोनाबाधितांपेक्षा कोरोनामुक्त होणाऱ्या रुग्णांची संख्या कमी होताना पाहायाला मिळत आहे. राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून जारी करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या २४ तासांत ३ हजार ३०१ रुग्ण कोरोनामुक्त झाले असून, यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण म्हणजेच रिकव्हरी रेट ९७.०२ टक्क्यांवर गेला आहे. तर, गेल्या २४ तासांत राज्यात एकूण ४ हजार ६५४ नव्या कोरोनाबाधित रुग्णांची नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या आकडेवारीनुसार, गेल्या २४ तासांत राज्यात ४ हजार ६५४ नव्या कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. तर, याच कालावधीत १७० रुग्णांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. तसेच ३ हजार ३०१ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. राज्यात आतापर्यंत एकूण ६२ लाख ५२ हजार १५० रुग्ण बरे झाले आहेत. आताच्या घडीला राज्यातील मृत्यूदर २.१२ टक्के इतका आहे. राज्यातील उपचाराधीन रुग्णांची संख्या एकूण ५१ हजार ५७४ इतकी आहे. गेल्या सलग अनेक दिवसांपासून राज्यातील नव्या कोरोनाबाधितांची संख्या १० हजारांच्या खाली राहिल्याचे सांगितले जात आहे. तसेच मुंबई महापालिका क्षेत्रात कोरोना संसर्गाची दुसरी लाट वेगाने घसरताना दिसत आहे.

# युवकाच्या हत्येप्रकरणी ३ जणांना पोलिसांनी घेतले ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका १५ वर्षीय युवकाच्या हत्येप्रकरणी तीन जणांना कळंबोली पोलिसांनी घेतल्याने या खूनाची उकल झाली आहे.

कळंबोली पोलीस ठाणे, हद्दीत दिनांक २३/०८/२०२१ रोजी सकाळी ०७:०० वा.चे सुमारास पुजा भवानी डेअरी फार्म समोरील रोडचे कडेला, स्टेट बँकेजवळ, से.५ ई कळंबोली या ठिकाणी एक १५ वर्षीय युवक जखमी अवस्थेत निपचित पडलेला आढळून आलेला होता त्यास उपचारासाठी उपजिल्हा रूग्णालय, पनवेल येथे दाखल केले असता, त्यास तेथील डॉक्टरांनी मृत घोषित केल्याप्रमाणे सदर प्रकरणी कळंबोली पोलीस ठाणे येथे गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून गुन्हयाचे घटनास्थळी विपिन कुमार सिंह, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, जय जाधव, पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली, शिवराज पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -२, पनवेल, भागवत सोनवणे, सहा.पोलीस आयुक्त, पनवेल विभाग यांनी तपासाबाबत दिलेले सुचना व मार्गदर्शनाखाली कळंबोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील व त्यांचे पथकाने तपास चालु केला. गुन्हयातील नमुद मयत मुलाचे आईचे मार्फतीने मयताची सर्वप्रथम ओळख पटवण्यात आली. त्याचे नाव नितेश सुनिल दुबेदी, वय- १५ वर्षे, रा.कोपरागाव, खारघर असे असल्याचे निष्पन्न झाले. मयत व त्याचे कुटूंबिय हे पुर्वी कळंबोली येथेच राहत होते. दोन महीन्यापुर्वी ते कोपरागाव, खारघर येथे राहण्यास गेलेले आहेत. मयत यास गांजा, दारू, भांग गोळी इ. व्यसनाची सवय होती. त्यासाठी तो .../४



# बनावट कंपनीच्या नावाखाली १७ लाखांची फसवणूक ; दोघांना अटक

**दै.रायगड नगरी । रोहा**

फॉरेक्स ट्रेडिंग या बनावट कंपनीच्या नावाखाली नोकरी लावतो असे आमिष दाखवत सदर कंपनीत गुंतवणूक केल्यास दाम दुप्पट नफा मिळवून देतो असे सांगत रोहे शहरातील एका १८ वर्षीय तरुणांसमवेत अन्य लोकांना सतरा लाखाहून अधिक रकमेची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. रोहा पोलिसांनी याविषयी मुंब्रा कौसा विभागातील दोघांविरोधात गुन्हा दाखल केला असून या प्रकरणातील दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांच्या या कामगिरीबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

आसिफ अ. गफार वलियानी व उस्मान गणी मोहम्मद शेख (दोघे रा. मुब्रा कौसा. जि.ठाणे) असे आरोपींचे नावे असून या दोन भामट्यांनी आपापसात संगणमत केले. फिर्यादी दानिश अल्ताफ नूराजी राहणार वरचा मोहल्ला, रोहा, याला फॉरेक्स ट्रेडिंग अश्या नावाची कंपनी असल्याचे व त्या कंपनीत पैसे गुंतवणूक केल्यास गुंतवणूकदारांना तसेच कंपनीत गुंतवणूकदार मिळवून देणाऱ्या एजंटला आर्थिक फायदा होतो. असे खोटे सांगत, आमिष दाखवून रोह्यातील तरुणाला कंपनीत नोकरीस घेतल्याचे खोटे नियुक्तीपत्र व ओळखपत्र तयार करून दिले. .../४

# खांदा कॉलनी येथे लसीकरण केंद्र सुरू करा : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**



खांदा कॉलनी येथे रोटरीतर्फे नेत्र ज्योत हॉस्पिटल येथे लसीकरण केंद्र सुरू होते. पालिकेचे वैद्यकीय अधिकारी आनंद गोसावी यांच्याकडून माहिती मिळाली की, हे लसीकरण केंद्र बंद झाले आहे, तरी काही संस्थांनी लसीकरण केंद्र सुरु करण्यास परवानगी माहिती मागितली असेल तर सर्व आवश्यक बाबी तपासून तातडीने परवानगी देऊन खांदा कॉलनी मधील नागरिकांसाठी तातडीने लसीकरण केंद्र सुरु करण्यात यावे अशी मागणी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी पनवेलचे आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

खांदा कॉलनी येथे लसीकरण केंद्र तातडीने सुरू करणे, खांदा कॉलनी सेक्टर ५, गुरुद्वारा संस्थेला लसीकरण केंद्र सुरू करण्याची परवानगी देण्यात यावी, घरकाम करणाऱ्या महिला, .../४

# कामगार नेते महेंद्र घरत यांची काँग्रेस रायगड जिल्हाध्यक्षपदी निवड

**दै.रायगड नगरी । उरण**

काँग्रेस पक्षाचा विस्तार, प्रसार, प्रचार, संघटन करण्याच्या दृष्टीकोणातून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. उपाध्यक्ष, महासचिव, सचिव, प्रवक्ते यासह अनेक नवे पदाधिकारी या कार्यकारिणीत जाहीर करण्यात आले आहेत. त्यामध्ये रायगड काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष पदी नामांकित डॅशिंग कामगार नेते महेंद्र घरत यांची निवड करण्यात आली आहे. काँग्रेसचे दिवंगत नेते बॅ.ए.आर.अंतूले, माजी आमदार मधुकर ठाकूर, माणिकराव जगताप यांचा लोकहिताचा वारसा पुढे सुरू ठेवणार असल्याचे सांगून अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या राष्ट्रीय अध्यक्षा सोनिया गांधी, खासदार राहुल गांधी, प्रियांका गांधी, प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले व मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष भाई जगताप



यांचे कामगार नेते महेंद्र घरत यांनी या नियुक्तीबद्दल आभार मानले आहेत.

२०२४ च्या लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन पक्षाचे जास्तीत जास्त खासदार निवडून आणण्याच्या अनुषंगाने तसेच काँग्रेस पक्षाला नवीन उभारी मिळवून देण्याच्या उद्देशाने अनेक पदाधिकाऱ्यांची नियुक्ती काँग्रेस पक्षात करण्यात आली. यात रायगड जिल्ह्यातून महेंद्र घरत यांचे नाव सर्वात आघाडीवर होते. काँग्रेसला अनुभवी, .../४

> प्रदेश काँग्रेसने टाकलेला विश्वास सार्थकी लावण्यासाठी काँग्रेसचे सर्व सेल, विभाग तसेच काँग्रेसचे सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या पाठबळावर मला रायगड जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यामुळे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली या संधीचे सोने करून रायगड जिल्ह्यात काँग्रेस पक्षाची ताकद वाढवविण्यासाठी अहोरात्र मेहेनत घेणार.
>
> **महेंद्र घरत, नवनिर्वाचित रायगड जिल्हाध्यक्ष,काँग्रेस**

## वडखळ व डोलवी ग्रामपंचायतीमध्ये विविध कामांचे पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्‌घाटने

# पेण तालुक्याचा समतोल विकास करण्यास प्राधान्य : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यात एका बाजूला औद्योगीकरण व दुसऱ्या बाजूला डोंगर पट्ट्यात राहणारा आदिवासी बांधव अशी भौगोलिक परिस्थिती आहे. त्यामुळे पेण तालुक्याचा समतोल विकास साधण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांनी आज वडखळ व डोलवी येथे बोलताना केले. डोलवी येथील ग्रामपंचायती मार्फत भरविण्यात आलेले मोफत आरोग्य शिबिर व फिल्टरेशन प्लांटचे उद्घाटन तसेच वडखळ ग्रामपंचायतीच्या मार्फत उभारण्यात आलेल्या



अभ्यास केंद्र इमारत व आधार केंद्राचे उद्घाटन आज पालक मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाले.

यावेळी वडखळ सरपंच .../४

# साडे २२ लाखांच्या वाहनांसह मोठ्या प्रमाणात गुटखा तळोजा पोलिसांकडून हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा पोलिसांकडुन लाखो रुपयांचा गुटखा , टाटा मोटर ट्रक व टाटा सुपर एस छोटा टेम्पो तसेच चोरीच्या गुन्ह्यातील मोटार सायकली व रिक्षा असा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये नशा मुक्ती अभियान राबविण्याबाबत तसेच वाहन चोरीस आळा घालण्यासाठी योग्य त्या उपाययोजना राबविण्याबाबत विपिन कुमार सिंह, पोलीस आयुक्त, नवी मुंबई , डॉ . जय जाधव, पोलीस सह आयुक्त, शिवराज पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -२ पनवेल यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे कार्यवाही चालू होती. तळोजा पोलीस ठाणे नेमणुकीतील पोउपनिरी कुटे यांना पेंथर, प्लॉट नं बी ४३ तळोजा एम.आय.डी.सी. या ठिकाणी गुटख्यांनी भरलेली दोन वाहने येणार असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाल्याने सापळा रचून मिळालेल्या बातमीप्रमाणे संशयीत दोन्ही वाहने त्यामध्ये ट्रक क्र. GJ 15 / -T / 8225 व टाटा सुपर एस.टॅम्पो - MH 43 / BP / 4517 अशी वाहने चालकाविना उभी असलयाची दिसुन आली. सदर दोन्ही वाहनांची तपासणी करता त्यामध्ये गुटखाजन्य पदार्थ असल्याचे दिसुन आल्याने त्याबाबत अन्न व औषध प्रशासन पेण जि. रायगड यांना माहिती देवून त्यांना पाचारण करून अन्न व सुरक्षा .../४

## संक्षिप्त...

## उरण तालुका कृषी विभागाकडून पिक स्पर्धेसाठी आवाहन

**दै.रायगड नगरी । उरण**

खरीप हंगाम २०२१ मधील सर्व साधारण व आदिवासी गटासाठी पीक स्पर्धा कृषी विभागाकडून आयोजित करण्यात आली असून, त्या स्पर्धेत सर्व शेतकरी बांधवांनी भाग घ्यावा असे आवाहन उरण तालुका कृषी अधिकारी चौधरी मॅडम यांनी केले आहे. पीक स्पर्धेतील शेतकऱ्यांचे पीक निहाय उत्पादकता तालुक्याच्या सर्वसाधारण उत्पादकते पेक्षा दीडपट किंवा त्यापेक्षा अधिक आहे अशा शेतकऱ्यांचे पीक कापणी प्रयोग घेऊन त्यांच्या मधून प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक ठरविण्यात येतील.तालुकास्तरावरील बक्षीसांची रक्कम रुपये प्रथम क्रमांक पाच हजार रुपये द्वितीय क्रमांक रुपये तीन हजार तृतीय क्रमांक रुपये दोन हजार पर्यंत बक्षीस दिले जाणार आहे.

येत्या खरीप व रब्बी हंगामात आपल्या तालुक्यात भात तूर व नाचणी या पिकांकरिता स्पर्धेचे आयोजन केले असून या करता दहा गुंठे क्षेत्रावर लागवड असणे आवश्यक आहे. ज्यांच्या नावावर शेती आहे व ते स्वतः शेती कसत आहेत असे सर्व शेतकरी या स्पर्धेमध्ये सहभागी होऊ शकतात. स्पर्धेत भाग घेणाऱ्या शेतकऱ्यांना एकाच वेळी एकापेक्षा जास्त पिकासाठी स्पर्धेत सहभाग नोंदविता येईल स्पर्धे मध्ये सहभाग नोंदविण्या करता विहित नमुन्यातील अर्ज तालुका कृषी अधिकारी कार्यालय उरण येथे स्वीकारले जाणार आहेत. याकरीता रक्कम रुपये तीनशे प्रवेश शुल्क असून अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालय उरण कार्यालयाशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे सदर स्पर्धेमध्ये सहभागाची संधी ३१ ऑगस्ट २०२१ अखेर आहे पीक कापणी प्रयोग घ्यावयाची किमान संख्या सर्वसाधारण गटासाठी झिरो पाच व आदिवासी गटासाठी झिरो चार आहे.पीक स्पर्धेतील शेतकऱ्यांनी आपल्या स्पर्धा प्लॉट्च्या कापणी तारखा चालू परिस्थिती पाहून निश्चित करायात व त्याबाबत लेखी सूचना तालुका कृषी अधिकारी यांना आठ दिवस अगोदर द्यायच्या आहेत. मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक व कृषी सहायक हे कार्यक्षेत्रातील स्पर्धकांशी सतत संपर्क साधून प्लॉट कापणी बाबत जरूर ती सिद्धता स्पर्धेकांच्या प्लॉटवर ठेवण्याबाबत कार्यवाही करतील पीक स्पर्धेत भाग घेतलेल्या स्पर्धकांनी माघार घ्यावयाची असल्यास कापणी पूर्व १५ दिवस अगोदर माघार घेतल्याचे सर्व संबंधित अधिकाऱ्यास लेखी कळवावे तसेच माघार कोणत्या कारणासाठी घेतली हे स्पष्ट नमूद करावे.

# माथेरानचे कार्यतत्पर एपीआय प्रशांत काळे यांची बदली

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये अल्पावधीतच आपल्या कार्याचा वेगळाच ठसा उमटवत इथल्या सर्वसामान्य लोकांशी अगदी घरोब्याचा संबंध आणि नाळ जुळलेले माथेरान पोलीस ठाण्याचे एपीआय प्रशांत काळे यांची आज येथून पेण (रायगड )येथे बदली झाली असून त्यांना निरोप देण्यासाठी माथेरानमधील सर्व पक्षीय व सामाजिक कार्यकर्ते, व्यापारी वर्ग तसेच कष्टकरी श्रमिक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केवळ पगारापूरता काम न करता शासनाच्या दिलेल्या जबाबदारी सोबतच सामाजिक कार्य, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात सहभागी होऊन फिल्डवर काम करणारे असे आजवरच्या कार्यकाळात एकमेव शासकीय अधिकारी म्हणून एपीआय प्रशांत काळे यांच्या नावाचा आवर्जून उल्लेख होत आहे.

माथेरान येथे आपल्या अडीच वर्षे कारकिर्दीत आपली वेगळी ओळख निर्माण करून फक्त पोलिसी कर्तव्य न करता खाकी वर्दीतील माणूसकीचे दर्शन माथेरानकरांनी प्रथमच अनुभवले आहे प्रत्येकाला नावाने ओळखणारे हे पहिलेच अधिकारी आहेत. त्यांच्या ह्या कार्यकाळात माथेरान कर कोरोनाशी झुंज देत असताना व दोनवेळा चक्रीवादळाशी झुंजताना त्यांच्यातील देवमाणसाचे वेळोवेळी दर्शन झाले अनेकवेळा कर्तव्याच्या पलीकडे जाऊन त्यांनी माथेरान करांना साथ दिली चक्रीवादळमध्ये कोणासही इजा वा नुकसान होऊ नये ह्याकरता ते रात्रंदिवस रस्त्यावर उतरले होते डोंगरांगांना लागून असलेल्या घरातील लोकांना रात्री स्वतः स्थलांतराला मदत करीत असल्याचे अनेकांनी पाहिले तर कोरोनाकाळात माथेरानमधील सर्व आर्थिक व्यवहार बंद असताना स्थानिकांना धीर व आधार देण्याचे काम त्यांनी केले ह्यावरच न थांबता येथील स्थानिकांना आधार म्हणून स्वतःच्या ओळखीने येथील अनेक कुटुंबांना जीवनावश्यक किट व येथील अश्वचालकांना खाद्य उपलब्ध करून देण्यास पुढाकार घेतला तसेच माथेरानमधील सह्याद्री रेस्क्यू टीम ही येथे दर्याखोऱ्यांमध्ये अपघातग्रस्त शव काढण्यास पोलिसांना नेहमीच मदत करत असताना त्यांना लागणारे दोर व इतर साहित्य उपलब्ध करून देऊन त्यांना मदत करण्याचे मोलाचे कार्य त्यांनी केले.

आज त्यांना निरोप देण्यासाठी येथील राम मंदिर चौक येथे येथील अनेक जण उपस्थित होते त्यांनी ह्यावेळी काळे साहेबांबरोबर ह्या कार्यकाळात त्यांना आलेला अनुभव सांगताना जड अंतकरणाने त्यांना निरोप दिला तर काळे हे आपल्या घरातीलच एक कुटुंब प्रमुख अन्य ठिकाणी वास्तव्यास जात आहेत त्यामुळे काहींना आपले अश्रू आवरता आले नाहीत. ह्यावेळी माथेरानच्या नगराध्यक्षा प्रेरणा सावंत, काँग्रेसचे विद्यमान नगरसेवक शिवाजी शिंदे, वन संरक्षण समितीचे अध्यक्ष योगेश जाधव, शिवसेना शाखाप्रमुख चंद्रकांत चौधरी, माजी नगरसेवक प्रकाश सुतार, राजेश दळवी, कुलदीप जाधव, राजेश चौधरी, ज्ञानेश्वर बागडे, भास्कर शिंदे, स्वाती कुमार, सुहासिनी शिंदे, स्मिता गायकवाड व माथेरान मधील सर्व पत्रकार उपस्थित होते.



माथेरान मध्ये आल्यावर इथली एकंदरीत भौगोलिक परिस्थिती पाहिली असता या ठिकाणी शांत स्वभावाची कष्टकरी माणसे असून इथे अधिक काही फारसे काम दिसत नसल्याने आपल्या कर्तव्यासोबतच सामाजिक कार्य करणे शक्य आहे. त्यामुळे आम्ही आमच्या कार्यकाळात जी काही लोकाभिमुख सामाजिक, शैक्षणिक कामे केली आहेत, इथल्या लोकांशी जे हितसंबंध जपले त्याचीच पोचपावती म्हणून माथेरान करांनी मला आपलेपणा दिला आहे आज सर्वांनी केलेला सत्कार आणि आदरातिथ्य हीच शिदोरी पुढील कार्यकाळासाठी उपयुक्त ठरणार आहे.

**प्रशांत काळे, एपीआय**
**माथेरान पोलीस ठाणे**

# वाशी खाडी पुलावर दुचाकी अपघातात तरुणाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मित्राला वाशी येथे सोडून गोवंडी येथे परतणाऱ्या तरुणाच्या मोटारसायकलला वाशी खाडी पुलावर अपघात झाल्याने सदर तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली. या अपघाताला मृत तरुण जबाबदार असल्याचे आढळुन आल्याने वाशी पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

या अपघातात मृत झालेल्या तरुणाचे नाव विशाल मनोहर निकम (३४) असे असून तो गोवंडी येथील लिंबुनी बाग येथे रहाण्यास होता. गत २० ऑगस्ट रोजी विशाल सोबत काम करणारा त्याचा मित्र रामदास शिवणकर हा विशालकडे गेला होता. मात्र रात्री उशीर झाल्याने रात्री ११:३० वाजण्याच्या सुमारास विशाल, रामदासला वाशी येथे सोडण्यासाठी आपली मोटारसायकल घेऊन गेला होता. रामदास ला वाशी येथे सोडल्यानंतर विशाल मोटारसायकलवरुन गोवंडी येथे परतत होता. विशाल वाशी खाडी पुलावर आला असताना, भरधाव वेगात असलेल्या मोटारसायकलवरुन त्याचे नियंत्रण सुटले. त्यामुळे विशाल मोटारसायकल सह खाली पडून गंभीर जखमी झाला. त्यामुळे इरफान खान व दानिश सैय्यद या दोघांनी जखमी विशालला आपल्या कारमधून गोवंडी येथील शताब्दी हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्याला मृत घोषीत केले.

गोवंडी पोलिसांनी या प्रकरणात आकस्मात मृत्यूची नोंद करुन पुढील कार्यवाहीसाठी वाशी पोलिसांकडे पाठवुन दिले. त्यानुसार वाशी पोलिसांनी केलेल्या तपासात मृत विशाल निकम याने निष्काळजीपणे व बेदरकारपणे मोटारसायकल चालविल्यामुळे सदरचा अपघात झाल्याचे आढळुन आले. त्यामुळे वाशी पोलिसांनी या अपघाताला विशालला जबाबदार धरून त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# रोहा शहर महिला सुरक्षा संघटनेच्या अध्यक्षपदी विनिता जंगम

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील दामिनी स्वयं – सहाय्यता महिला समुहाच्या क्रियाशील अध्यक्षा सौ.विनिता विजय जंगम यांची महिला सुरक्षा संरक्षण तसेच अन्याय व अत्याचार विषयक वाचा फोडून आवाज उठविणाऱ्या महिला सुरक्षा संघटना – (महाराष्ट्र राज्य) रोहा शहर अध्यक्षा पदी विनिता जंगम यांची नियुक्ती करण्यात आली. महिला सुरक्षा संघटना (महाराष्ट्र राज्य) कोकण विभागीय अध्यक्षा दिपीका दिपक चिपळूणकर यांच्या हस्ते रोहा तालुक्यातील सौ. विनिता विजय जंगम यांची महिला सुरक्षा संघटना रोहा शहर अध्यक्षा पदी निवडीचे नियुक्ती पत्रक देण्यात आले.

# गणेशोत्सवापूर्वी रस्त्यावरील खड्डे भरण्यात यावे : राष्ट्रवादी



**दै.रायगड नगरी । तळा**

गणेशोत्सवापूर्वी तळा शहरातील खड्डे भरण्यात यावे तसेच कित्येक दिवसांपासून बंद असलेले पथदिवे देखील सुरू करण्यात यावे यासाठी राष्ट्रवादीच्या नगरसेवकांकडून मुख्याधिकारी माधुरी मडके यांना निवेदन देण्यात आले.

शहरातील बाजारपेठेत मुख्य रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. शहरात खेड्यापाड्यातील नागरिक विविध कामानिमित्त येत असल्याने या खड्ड्यांचा त्रास शहरवासीयांबरोबर संपूर्ण तळा तालुक्यातील नागरिकांना होत आहे. तसेच नगरपंचायत हद्दीतील बऱ्याच ठिकाणचे पथदिवे अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत असल्याने व सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने रात्री अपरात्री अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. गणेशोत्सवासाठी मोठ्या प्रमाणावर चाकरमानी गावाकडे परतत असतात त्यांना देखील या सर्व समस्यांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे गणेशोत्सवापूर्वी शहरातील सर्व खड्डे भरण्यात यावेत तसेच नगरपंचायत हद्दीतील सर्व पथदिवे सुरू करण्याची कार्यवाही करावी यासाठी मुख्याधिकारी माधुरी मडके यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांनी निवेदन दिले. याप्रसंगी गटनेते मंगेश शिगवण, चंद्रकांत रोडे, प्रकाश गायकवाड, शहर अध्यक्ष महेंद्र कजबजे, राकेश नांदगावकर उपस्थित होते.

# कळंबोलीतील खिडूकपाडा येथे ४ लाखांची घरफोडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरफोडी करणाऱ्या चोरट्यांनी कळंबोलीतील खिडूकपाडा येथे रहाणाऱ्या कमलाकर पाटील यांचे घर फोडून त्यांच्या घरा-तील सुमारे ४ लाख रुपये किंमतीचे दागिने व रोख रक्कम चोरुन नेल्याचे उघडकिस आले आहे.

कळंबोली पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली आहे. खिडुकपाडा येथील विठ्ठल रखुमाई मंदिरासमोर राहणारे कमलाकर पाटील (६५) यांनी सुधागड पाली येथे शेतीसाठी जमीन घेतल्याने ते पत्नीसह शेती करण्यासाठी गेले होते. यादरम्यान, त्यांचे घर बंद असल्याची संधी साधुन अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचा कडी कोयंडा तोडून त्यांच्या घरातील दागिने व रोख रक्कम असा सुमारे ४ लाख रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेला. दरम्यान, शेजारी राहणाऱ्या कमलाकर पाटील यांच्या मुलाला सदर प्रकार लक्षात आल्यानंतर त्याने याबाबतची माहिती वडील कमलाकर पाटील यांना दिली. त्यानंतर त्यांनी पत्नीसह आपल्या घरी धाव घेतली. त्यानंतर त्यांनी कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करुन चोरट्यांचा शोध सुरु केला आहे.

---

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे : हातनोली, तालुका : खालापूर, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत ही मुळ जमीन मालकांकडून मी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : हातनोली, तालुका : खालापूर, जिल्हा : रायगड**

| गांव | भोगवटादाराचे नांव | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| हातनोली | अमन अस्लम मुन्शी<br>अ.समी अस्लम मुन्शी<br>जबीन अस्लम मुन्शी | ३७/४/ब | ०-४९-६०<br>पो.ख.०-०५-१०<br>ए.क्षेत्र ०-५४-७० | ६.७८ |
| | | पैकी | ०-१८-०० | २.४६ |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षिस, लीज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न झाल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रार रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन मी वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करेन व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी या माझेवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : खालापूर
दि.२७/०८/२०२१

**सही/-**
**श्री.पंढरीनाथ डाळुराम भोईर**
**ऑफिस नं.२५, सुखम हॉस्पिटलच्या खाली, जसदनवाला कॉम्प्लेक्स, विश्राळी नाकाजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९१६७०६२६३७**

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे : महोदर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत आहे. सदरहू मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतींचे मालक श्री.बगाराम मुंगा रोडपालकर यांच्याकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

शेतजमीन मिळकतीचे वर्णन
मौजे : महोदर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत

| अ.क्र. | जमीन मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री बगाराम मुंगा रोडपालकर | ११ | ३ | ०-३१-६०<br>पो.ख. ०-०२-८०<br>एकूण ०-३४-४० | ५.८१ |

तरी सदर मिळकती संबंधी कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण दान, बक्षिस, खरेदीखत, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क-हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, अशा हरकतीमध्ये नमूद केलेल्या हक्कांबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

पनवेल
दि.२७/०८/२०२१

**सही/-**
**रोहिदास हरी आगलावे**
**ॲडव्होकेट, पनवेल**
**शॉप नं.०३, जय नारायण बिल्डींग, राम गणेश गडकरी मार्ग, गावदेवी मंदिराजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**

---

अर्जदाराचे वकील
ॲड.मेहबूब गै. पटेल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रिमीनल चौ.अर्ज क्र.८३०/२०२१
ने.ता.०४/१०/२०२१

श्री.अझहर युनुस मस्ते
वय : ५७ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.फ्लॅट नं.३, मौलाना मंझिल,
२ रा मजला, वाझी मोहल्ला,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

मा.आयुक्त सो./मा.निबंधक सो,
जन्म मृत्यू नोंदणी,
पनवेल महानगरपालिका,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, पै.आईशा युनूस मस्ते यांचा मृत्यू दि.०९/०९/२०१२ रोजी मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील राहत्या घरी झालेला आहे.

वरील पै.आईशा युनूस मस्ते यांचा मृत्यू दि.०९/०९/२०१२ रोजी पनवेल येथे झाला आहे. असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदाराने यांनी या मे.कोर्टात मृत्यू दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. पै.आईशा युनूस मस्ते यांचे मृत्यूबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांना मृत्यू दाखला देण्याची ताबडतोब कार्यवाही करेल.

आज दि.२७/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**
(कोर्टाचा शिक्का)
**सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

---

मा.मुजावर साहेब कोर्ट
दिवाणी अ १५० म.
शा.नि.न्या.वि.क्र.१११७९, दि.१२.२.१२
वारसांचे सर्टिफिकेटबद्दल
जाहीरनामा

अर्जदाराचे वकील
श्री.एकनाथ जी. खुटले

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.२ रे सहदिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१०९३/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२८/०९/२०२१

ज्यापेक्षा कै.कृष्णा गणपत गायकवाड हे दि.१०/०५/२०२१ रोजी किंवा त्या सुमारास मौजे : ओवळे, तालुका : पनवेल, जि.रायगड येथे मयत झाला / झाले आणि अर्जदार १) श्रीमती.लिलाबाई कृष्णा गायकवाड, २) श्री.धनराज कृष्णा गायकवाड, ३) श्री.संतोष कृष्णा गायकवाड, ४) सुरेखा कृष्णाा गायकवाड, १ ते ४ रा.ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड ५) सौ. सपना सचिन पाटील रा.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड ह्यांनी / ह्याने ह्या कोर्टास सदरहू मयत कै.कृष्णा गणपत गायकवाड यांचे नांवे खालील मिळकतींबाबत वारसांचे सर्टिफिकेटबद्दल मिळावे असा अर्ज केला आहे.

**जमिनींचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| ओवळे-८४ | १३ | ३ | ०-३०-६ |
| | १४२ | २ ब | ०-१४-७ |
| | १४२ | १२ अ | ०-११-६ |

सदर मिळकतींचे संपादनाच्या मोबदल्यात खालील वर्णनाचा भूखंड झालेला आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| पुष्पक | ३ | ४१२ | ८८० |

त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे कायदेशीर वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत कै. कृष्णा गणपत गायकवाड यांचे वारसाचे सर्टिफिकेट देईल, आज तारीख २५ माहे ऑगस्ट सन २०२१

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
(कोर्टाचा शिक्का)
**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

राव साहेब

अर्जदाराचे वकील
ॲड.संगम सावंत

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.११०७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०१/१०/२०२१

१) श्री.मंगेश पंढरीनाथ गोवारी
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.रमेश पंढरीनाथ गोवारी
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.हनुमान पंढरीनाथ गोवारी
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी
४) मनिषा पंढरीनाथ गोवारी
वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.१२४० ए, मानसरोवर स्टेशन रोड,
कराडी समाजमंदिर, जुई कामोठे,
कळंबोली नोड, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांची आई कै.ताईबाई पंढरीनाथ गोवारी, दि.२३/०८/२०२० रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेल्या आहेत.

कै.ताईबाई पंढरीनाथ गोवारी यांचे नांवे व सामाईकांत खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**अ) मिळकतींचे वर्णन**

| अ.क्र. | गावाचे नांव | मिळकतीचा तपशिल |
|---|---|---|
| १ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | उमिया किरण, प्लॉट नं.७१, सदनिका क्र.३०४, सेक्टर २१, क्षेत्र ७७.७३ चौ.मी. बिल्टअप + टेरेस १.८४ चौ.मी. |
| २ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | उमिया किरण, प्लॉट नं.७१, सदनिका क्र.३०१, सेक्टर २१, क्षेत्र ७७.७३ चौ.मी. बिल्टअप + टेरेस १.८४ चौ.मी. |
| ३ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | उमिया किरण, प्लॉट नं.७१, सदनिका क्र.३०३, सेक्टर २१, क्षेत्र ७७.७३ चौ.मी. बिल्टअप + टेरेस १.८४ चौ.मी. |
| ४ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | उमिया किरण, प्लॉट नं.७१, शॉप क्र.३, सेक्टर २१, क्षेत्र ३३.४९० चौ.मी. बिल्टअप + लॉफ्ट ७.८७५ चौ.मी. |
| ५ | कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | युनिट केस नं.कामोठे/३१७ कामोठे ४१४ |

**स्थावर मिळकत**
**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| कामोठे ३१७ | ३० | १ | ०-२०-१ |
| | ३१ | १ | ०-३४-० |
| | ३१ | ४ | ०-१३-१ |
| कामोठे ४१४ | ३२ | ४ | ०-०५-३ |

येणेप्रमाणे मिळकतींचे वर्णन असून सदर मिळकतींपैकी सदनिका व दुकानी गाळ्यांमध्ये कै.ताईबाई पंढरीनाथ गोवारी यांचा प्रत्येकी ५० टक्के हिस्सा नांवे असून वर उल्लेखिलेल्या स्थावर मिळकतीं ह्या फक्त कै.ताईबाई पंढरीनाथ गोवारी यांचे नांवे आहेत. त्यात ताईबाई यांचा पूर्ण हिस्सा आहे.

येणेप्रमाणे वर वर्णन केलेल्या मिळकतींच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार कै.ताईबाई पंढरीनाथ गोवारी यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा वारसदाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर कै.ताईबाई पंढरीनाथ गोवारी यांचे वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वाारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२७/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व मे.न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
(कोर्टाचा शिक्का)
**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## सर्पदंशाने बैल दगावला ; बाहे येथील घटना

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील बाहे गावातील शेतकऱ्याचा उमदा बैल सर्पदंशाने दगावला असल्याने शेतकऱ्यावर फारच मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार बाहे गावातील विलास तुकाराम निकम यांच्या गोठ्यात बांधलेल्या त्यांच्या शेतीचे कामासाठी व बैलगाडीचे कामासाठी उपयुक्त असणाऱ्या बैलजोडीपैकी एका बैलास सोम.दि.२३ ऑगस्ट रोजी सकाळच्या सुमारास सर्पदंश झाल्याने

बैल दगावल्याने विलास निकम यांच्यासमोर फारच मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.शेतीचे कामासाठी व बैलगाडीचे कामासाठी उपयुक्त असणारा बैल सर्पदंशाने एकाकी दगावल्याने विलास निकम हे हवालदिल झाले असून त्यांच्यावर कोसळलेल्या या संकटामुळे सर्वत्र हळहळही व्यक्त करण्यात येत आहे.



विलास निकम हे बाहे गावातील क्रुषीनिष्ठ शेतकरी म्हणून ओळखले जातात. ऊन्हाळी हंगामात आपल्या शेत जमिनीत भाजीपाला लागवड तर पावसाळी हंगामात भातशेतीची लागवड करून आपला उदरनिर्वाह त करीत आहेत.

या सर्व कामासाठी त्यांना आपल्या बैलजोडीचा मोठाच हातभार लागत असल्याने व सर्पदंशाने एक बैल दगावल्याने त्यांच्यासमोर मोठेच संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत संबंधित प्रशासन यंत्रणेने या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन विलास निकम यांना नवीन बैल खरेदी करण्यासाठी शासनाने जास्तीत जास्त आर्थिक हातभार लावून सहाय्य करावे. अशाप्रकारची मागणी अन्य शेतकरी वर्गाकडून केली जाऊ लागली आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


### मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांचा बैठकीत आढावा...

## झोपडपट्टी पुनर्वसनातील रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्यासाठी आराखडा तयार करा : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईतील रखडलेले झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प मार्गी लावण्यासाठी म्हाडा व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी निश्चित आराखडा तयार करावा, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. मुख्यमंत्री श्री.ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या कामाचा आढावा घेण्यात आला.



वर्षा या शासकीय निवासस्थानी झालेल्या या बैठकीस गृहनिर्माण मंत्री डॉ.जितेंद्र आव्हाड, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री अनिल परब,आमदार सुनील प्रभू,मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे अध्यक्ष विनोद घोसाळकर, मुख्य सचिव सीताराम कुंटे,मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, मुंबईचे जिल्हाधिकारी राजीव निवतकर, मुंबई उपनगरच्या जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश लोखंडे आदि उपस्थित होते.

रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना पूर्ण करण्यास जर विकासकाने असमर्थता दर्शवली असेल किंवा विकासकाकडून प्रकल्पाच्या कामास विलंब होत असेल तर असे प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी कोणत्या उपाययोजना व विविध पर्यायांचा कसा अवलंब करता येईल याची कार्यपद्धती निश्चित करावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

कायमस्वरूपी संक्रमण शिबिरांबाबत सुसंगत नियमावली तयार करून लोकांना दिलासा द्यावा असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात बेघर झालेल्या लोकांची थकीत भाडे देण्यासंदर्भात मार्ग काढण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, प्रकल्प पूर्ण करण्यासाठी काही नियमांची शिथिलता व अंमलबजावणी, प्रकल्प कालबद्ध व विशिष्ट मर्यादित होण्यासाठी करावयाचे नियम याबाबतही या बैठकीत चर्चा करण्यात आली.

## उरणमध्ये अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कारवाई करावी

### जागरूक नागरिकांचे उरण पोलिस ठाण्यात निवेदन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहर व परिसरातील आमली पदार्थ विक्री व सेवन करणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. त्यात मुख्यते तरुण वयातील मुले -मुली ह्या व्यसनाला बळी पडत आ-हेत. त्यावर आळा बसण्याच्या उद्देशाने उरण शहरातील जागरूक नागरिकांनी नुकतेच उरणचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र बुधवंत यांना पोलिस ठाण्यात कर्तव्यावर असलेले सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रकाश पवार यांच्या मार्फत निवेदन दिले आहे.



उरण शहर व परिसरातील आमली पदार्थ विक्री व सेवन करणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. त्यात मुख्यते तरुण वयातील मुले -मुली ह्या व्यसनाला बळी पडत आहेत. या गंभीर बाबीकडे गांभीर्याने दखल घेऊन कायदेशीर कारवाई करावी. जेणे करून तरुण पिढी या व्यसनाकडे भरकटत चालली आहे. त्याला आळा घालण्यासाठी संबंधितांचा शिताफीने शोध घेऊन योग्य कारवाई करावी असे नमूद करण्यात आले आहे.

या वेळी निवेदन देतांना उरण येथील इमरान बुबेरे, अदनान खान, अदिब भाईजी, हनीफ बक्षी, मार्जान तुंगेकर, फहाद पटेल, सऊद कुंवावाला, ॲड .नियाज पठाण आदी उपस्थित होते.

## नांदगावच्या नर्सिंग कॉलेजमध्ये कॅम्पस मुलाखत द्वारा विद्यार्थी परिचारिकांची निवड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील नूतन स्कुल ऑफ नर्सिंग नांदगाव या ग्रामीण भागातील नर्सिंग कॉलेज मध्ये जुपिटर हॉस्पिटल ठाणे या भरतातिल विख्यात हॉस्पिटलचि कॅम्पस मुलाखत झाली. जुपीटर हॉस्पीटलचि मुख्य शाखा दादर येथे असून अन्य शाखा इंदोर,पुणे व ठाणे येथे आहे.या हॉस्पिटल च्या कॅम्पस मुलाखती मध्ये नांदगाव नर्सिंग कॉलेज मधील शैक्षणीक वर्ष २०-२१ GNM व ANM कोर्स पूर्ण झालेल्या विद्यार्थिनींचि निवड जुपिटर हॉस्पिटल येथील शाखा मध्ये झाली. निवड झालेल्या विद्यार्थिनींचे अभिनंदन कॉलेज संस्थापक डॉ. नूतन रामलिंग माळी यांनी केले. सध्याच्या कोरोनाजन्य परिस्तिथिती मध्ये परिचारिका घडविणे ही काळाची गरज आहे. असे मत कॉलेजचे प्राचार्य विजय उबाळे यांनी व्यक्त करुन ग्रामीण भगामध्ये परिचारिका घडविण्यासाठी (ANM २ वर्ष व GNM ३ वर्ष) या कोर्ससाठी प्रवेश घेण्याचे आवाहन केले आहे.

## जिल्ह्यात दि.२५ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या सूचनेनुसार रायगड जिल्ह्यामध्ये दि.२५ सप्टेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती दिवाणी न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग श्री.संदीप वि. स्वामी यांनी दिली आहे.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, १३८ एन.आय.ॲक्ट, खालील प्रकरणे, दिवाणी अपिले, तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे व अपिले ठेवली जाणार आहेत.

तसेच नगरपालिका व ग्रामपंचायत यांच्या घरपट्टी व पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या लोकअदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये प्रकरणे तडजोडीने निकाली केल्यास लोकांचा पैसा आणि वेळ यांचा अपव्यय होत नाही, पक्षकारांना तात्काळ न्याय मिळतो. त्यामुळे दि.२५ सप्टेंबर २०२१ रोजी रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग श्रीमती विभा प्र. इंगळे यांनी केले आहे.

## पॅरामेडिकल्स प्रोफेशनल अभ्यासक्रमासंदर्भात मार्गदर्शन शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । माथेरान**

प्रेम लक्ष चॅरिटेबल ट्रस्ट संचलित प्रेमा लक्ष्मण विद्यालय व जी.एम.एस पॅरामेडिकल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमानाने पॅरामेडिकल्स प्रोफेशनल अभ्यासक्रमासंदर्भात मार्गदर्शन शिबीर संपन्न झाले.



पॅरोमेडिकल आरोग्य क्षेत्रात करीअर घडवूया या मार्गदर्शन शिबिराला विद्यार्थ्यांचा उस्फूर्त सहभाग लाभला. वैद्यकीय क्षेत्रात करिअर करायचे असल्यास फक्त डॉक्टरच झाले पाहिजे असे नाही. उपवैद्यकीय अर्थात पॅरामेडिकल क्षेत्रातही अनेक संधी निर्माण झाल्या आहेत. आजच्या करोना काळात वैद्यकीय सेवेत विविध पदावर काम करणाऱ्या प्रत्येकाला महत्त्व प्राप्त झाले आहे, यापुढेही या क्षेत्रात मनुष्यबळाची गरज लागणार असल्याचे सध्या तरी दिसून येत आहे असे मत जी.एम. एस पॅरामेडिकल कॉलेज चे प्राचार्य राज पंडीत यांनी विद्यार्थ्यांना पॅरामेडिकल अभ्यासक्रमासंदर्भात माहिती मार्गदर्शन शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना सांगितले.

या शिबिराला प्रमुख मार्गदर्शक जी. एम. एस पॅरामेडिकल कॉलेजचे प्राचार्य राज पंडीत, मनोज जॅकॉब, जॉर्ज वरघीस, डॉ.राखी दिघे, डॉ. सुमेध देसाई, पदमीनी भोईर, कानल रावल, प्रेमलक्ष चॅरिटेबल ट्रस्ट कार्याध्यक्ष दिपेश गावंड, मुख्याध्यापिका मनप्रीत कौर, आदी मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. यादरम्यान प्रेमा लक्ष्मण विद्यालयाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

दहावी व बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात आपले भविष्य घडवण्यासाठी प्रेम लक्ष चॅरिटेबल ट्रस्ट संचलित प्रेमा लक्ष्मण विद्यालय पेणकरपाडा व जी. एम. एस पॅरामेडिकल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रेमा लक्ष्मण विद्यालयात पेणकरपाडा येथे 'मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर मार्गदर्शन शिबीराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी उपवैद्यकीय अभ्यासाकरीता प्रवेश घ्यावा व त्यातील करीअरच्या संधीचा चांगल्या पध्दतीने उपयोग करुन घ्यावा यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. शिबीराअंती विद्यार्थी आणि पालक वर्गाकडून या मार्गदर्शन शिबिराबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.

आपल्या विभागातील मुलांनी आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्स या व्यतिरिक्त नवीन करिअर अभ्यासक्रमाची माहिती जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्न करून, त्यांना त्यांच्या आवडत्या क्षेत्रात सक्षम होण्यासाठी अशा मार्गदर्शन शिबिरांची विद्यार्थ्यांना गरज आहे असे प्रेम लक्ष चॅरिटेबल विद्यमान कार्याध्यक्ष दिपेश गावंड यांनी सांगितले व उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले.

## दिघाटी येथे हनुमान मंदिर जिर्णोद्धार व कलश पूजन सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

पनवेल तालुक्यातील दिघाटी येथे हनुमान मंदिर जिर्णोद्धार कार्यक्रम आणि कलश पूजन सोहळा माजी आ. तथा शिवसेना जिल्हाप्रमुख मनोहर भोईर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पाडण्यात आला.

सदर मंदिरासाठी माजी आमदार मनोहर भोईर यांनी दहा लाखाचा निधी उपलब्ध करून दिला व स्वखर्चाने १२५ सिमेंटच्या गोणी उपलब्ध करून दिल्या. तसेच मंदिराचे सुशोभिकरणाचे काम अद्याप बाकी असून त्याकरिता स्व:खर्चाने एक लाख रुपये देण्याचे जाहीर केले.

पद असो वा नसो त्याने आपल्या जी-वनात फरक पडत नाही, सर्व सामान्य जनतेचे हित जोपासणे म्हणजेच ईश्वरपूजा केली, असे मी समजतो. जीवनात हारजीत हि होतच असते, मी जिंकल्यावर उन्माद केला नाही व पराभवानंतर खचून न जाता जनसेवेला पुन्हा आरंभ केला, त्यासाठी केलेली सेवा उपयोगी पडेल. याहीपुढे जनसेवेचे काम सतत सुरू रा-हील असे उदगार माजी आमदार मनोहर भोईर यांनी दिघाटी येथील हनुमान मंदिर येथे जीर्णो द्धार कार्यक्रम व कलश पूजन सोहळ्या निमित्त बोलताना काढले. या हनुमान मंदिर जिर्णो द्धार व कलश पूजन कार्यक्रमासाठी उपसरपंच रोहिदास शेडगे तसेच हनुमान मंदिर अध्यक्ष हिरामण ठाकूर, खजिनदार भरत गावंड, अर्जुन ठाकूर, सुरेश शेडगे, चेतन शेडगे, लक्ष्मण ठाकूर, हरिश्चंद्र म्हात्रे, अरुण ठाकूर, सखाराम ठाकूर, हसुराम ठाकूर आणि सर्व सभासद व शिवसेनेचे कार्यकर्ते उपस्थितीत होते.



## अरनॉल्ड क्लासिक युरोप बॉडी बिल्डिंग स्पर्धेसाठी पनवेल तालुक्यातील गिरीश पाटील यांची निवड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१६ ते २० सप्टेंबर २०२१ दरम्यान युरोप स्पेन येथे होणाऱ्या अरनॉल्ड क्लासिक युरोप या बॉडी बिल्डिंग स्पर्धे साठी भारतातून १७ लोकांची निवड झाली आहे. त्यामध्ये पनवेल तालुक्यातील गिरीश पंढरीनाथ पाटील (खारकोपर गव्हाण) येथील युवकाची निवड झाली आहे. त्या प्रकारचे पत्र त्यांना इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस (खत्रइइ) यांच्याकडून मिळाले.

सदर बॉडी बिल्डिंग स्पर्धेमध्ये संपूर्ण जगातील वेगवेगळ्या देशातील खेळाडू सहभाग घेतात. आपल्या पनवेल मधील एक होतकरू तरुण देशाबाहेर जाऊन पनवेल बरोबरच देशाचे नाव त्या ठिकाणी वाढविणार आहे.

त्याच्या या भावी कारकीर्दीस पनवेलचे मजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, अनंतशेठ म्हात्रे, जे.एम. म्हात्रे चॅरीटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रितम जनार्दन म्हात्रे, भगवान घरत, सुहास देशमुख, रमेश ठाकुर, प्रमोद पाटील, जगन्नाथ म्हात्रे, हरिभाऊ पाटील, रामनाथ ठाकूर, प्रकाश भोईर, बी.यू.पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच सदर खेळादरम्यान त्याला आवश्यक त्या सर्व गोष्टींचे सहकार्य जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या मार्फत केले.



### कॉन्ट्रॅक्टरवर निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल

## खिडकीची ग्रील बसविताना तिसऱ्या मजल्यावरुन खाली पडलेल्या दोन कामगारांचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घणसोली सेक्टर-९ मधील ओमकार को. हौसिंग सोसायटीत तिसऱ्या मजल्यावर खिडकीचे ग्रिल बसविण्याचे काम करणारे दोघे कामगार खाली पडल्याने दोघा कामगारांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना उघडकिस आली आहे. या घटनेतील मृत कामगारांना ठेकेदाराने कुठल्याही प्रकारची सुरक्षेची साधने न पुरविल्यामुळे सदरची दुर्घटना घडल्याचे आढळुन आले आहे. त्यामुळे रबाळे पोलिसांनी या दुर्घटनेला फॅब्रिकेशन कॉन्ट्रक्टरला जबाबदार धरुन त्याच्या विरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल आहे.

या दुर्घटनेत मृत झालेल्या कामगारांमध्ये मन्नु बिंदु राजभर (२५) आणि देवानंद राजभर (२३) या दोघांचा समावेश असून हे दोघेही उत्तर प्रदेश राज्यातील गाजीपुर भागात रहाण्यास होते. सध्या ते घणसोली सेक्टर-७ मध्ये रहाण्यास होते, तसेच ते फॅब्रिकेशन कॉन्ट्रॅक्ट नारायण आव्हाड याच्याकडे फॅब्रिकेशनचे काम करुन आपला उदरनिर्वाह चालवित होते. कॉन्ट्रक्टर नारायण आव्हाड याला गत २३ ऑगस्ट रोजी घणसोली सेक्टर-९ मधील ओमकार को.हौसिंग सोसायटीतील तिसऱ्या मजल्यावर खिडकीचे ग्रील बसविण्याचे काम मिळाले होते.

त्यानुसार नारायण आव्हाड याने त्याच्याकडे कामास असलेल्या मन्नु राजभर व देवानंद राजभर या दोघांना खिडकीचे ग्रील बसविण्याच्या कामासाठी लावले होते. यावेळी दोघेही दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास तिसऱ्या मजल्यावरील खिडखीच्या ग्रीलचे काम करत असताना दोघेही ग्रील सोबत खाली पडले. या दुर्घटनेत दोघेही गंभीर जखमी झाल्याने त्यांना प्रथम वाशीतील महापालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर देवानंद यास मुंबईतील केईएम रुग्णालयात तर मन्नु याला नेरुळ मधील ओजस हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान बुधवारी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास मन्नु राजभर याचा तर दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास देवानंद याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर रबाळे पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासात फॅब्रिकेशन कॉन्ट्रॅक्ट नारायण आव्हाड याने ग्रीलचे काम करणाऱ्या मन्नु आणि देवानंद या दोघांना सुरक्षेच्या दृष्टीने कुठल्याही प्रकारची साधन सामुग्री दिली नसल्याचे आढळुन आले. त्यामुळेच या दोघांचा तिसऱ्या मजल्यावरुन खाली पडून मृत्यू झाल्याचे आढळुन आल्यानंतर रबाळे पोलिसांनी मृत तरुणांचा नातेवाईक मनोज भारद्वाज याच्या तक्रारीवरुन नारायण आव्हाड याच्याविरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे.